जादुई वसंत

कोरियाची लोककथा



जादुई वसंत

कोरियाची लोककथा

खूप जुनी गोष्ट आहे. कोरियाच्या एका छोट्या गावात एक वृद्ध दांपत्य राहत होते. त्यांना कोणी मुलबाळ नव्हते. ते दोघे कष्टाळू होते. त्यांना मनापासून एक मुल हवं होतं - ज्याचं ते संगोपन करू शकतील. त्यांचा श्रीमंत आणि लालची शेजारी नेहमी त्यांच्या जुन्या, ठिगळे लावलेल्या कपड्यांची चेष्टा करायचा. जेव्हा म्हातारा माणूस लाकडं फोडत असे, तेव्हा तो शेजारी त्याला टोमणे मारे आणि म्हणे, “म्हाताऱ्या, मदतीसाठी तुझा मुलगा कुठे आहे?”

मग दिवस एक रहस्यमय अशी निळी चिमणी म्हाताऱ्या माणसाला एका जादूच्या झऱ्याजवळ घेवून जाते. झऱ्याचे पाणी पिऊन म्हातारा तरुण होतो. पण ही फक्त अर्धी कहाणी आहे. झऱ्याची अद्भुत शक्ती त्या वृद्ध दांपत्याला त्या कदर नसलेल्या शेजाऱ्यापासून न्यायपण देते. शेवटी त्या वृद्ध दांपत्याला एका उजाड अशा अनोळखी जागेत एक मुल सुद्धा मिळते.

जादुई वसंत

कोरियाची लोककथा

मराठी : अश्विनी बर्वे

जुनी गोष्ट आहे. कोरियाच्या एका गावात एक प्रामाणिक वृद्ध नवरा बायको राहत होते. असे म्हणत की, तो माणूस खरच खूप म्हातारा होता, त्याच्या पाठेची वाकून कमान झाली होती. आणि त्याची दाढी सफेद झाली होती. त्याला कोणी मुलबाळ नव्हते म्हणून त्या माणसाला रोज जंगलात लाकडं फोडण्यासाठी जावे लागे. आणि म्हातारी दिवसभर घरात कपडे शिवत बसे. कारण त्यांच्या घरात कोणी मुल नव्हते.

त्यांचा शेजारी एक श्रीमंत माणूस होता. तो अधिक लालची होता. तो आपलं सगळं काम नोकरांवर सोपवत असे. जेव्हा कधी तो म्हाताऱ्या माणसाला कुऱ्हाड घेवून जंगलात जातांना पाहत असे तेव्हा तो हसत टोमणे मारत असे. “अरे म्हाताऱ्या मदतीसाठी तुझा मुलगा कुठे आहे?” तो लालची माणूस म्हातारीने शिवलेल्या कपड्यांवर नेहमी हसत असे.

पण ते वृद्ध दांपत्य हे सगळं सहन करत असत. त्यांनी एकमेकांजवळ सुद्धा त्याची कधी तक्रार केली नाही.

वंसतातल्या एका सकाळी रोजच्या प्रमाणे म्हातारा जंगलात लाकडं कापण्यासाठी गेला. त्या दिवशी हळूहळू वारा वाहत होता आणि सूर्यप्रकाश झाडांच्या फांद्यामधून लपंडाव खेळत होता.म्हाताऱ्याने विचार केला, “आज खूप छान हवा आहे. थोड्यावेळ आराम करूया आणि मग कामाला सुरुवात करू या.” मग तो एका झाडाच्या बुंध्याजवळ बसला.

तेव्हाच एक निळी चिमणी उडत तिथं आली आणि म्हाताऱ्याच्या जवळच्या फांदीवर बसली. चिमणी चे गाणं मोठं गोड होतं. जसं की पावसाचे थेंब पडत आहे. त्या गाण्यात म्हातारा अगदी गुंग झाला. आणि आपलं सगळं काम विसरून गेला.



तेवढ्यात अचानक चिमणी उडून दुसऱ्या झाडावर गेली. म्हातारा तिच्या मागे मागे गेला.पण तेवढ्यात चिमणी उडून आणखीन पुढे गेली. चिमणी सतत गात होती आणि म्हातारा तिचा पाठलाग करत होता.

अशाप्रकारे डोंगर, दऱ्या, आणि झरे पार करत म्हातारा चिमणीच्या मागे-मागे चालत राहिला. तो चालता चालता चिमणीचे मधुर गीत ऐकत होता.

शेवटी चिमणी वेगाने उडत दरी मध्ये गेली. आणि तिथे दगडांच्या कपारीत बसली. तिथे बसून चिमणी त्या म्हाताऱ्याकडे पाहत होती आणि सतत गात होती. थोड्यावेळाने म्हातारा जोरजोराने श्वास घेत चिमणी पर्यंत पोहचला.

जसा म्हाताऱ्याने दीर्घ श्वास घेतला, तसं दोन दगडांच्या मधून पाण्याचा एक झरा वाहतांना त्याला दिसला. त्याने इतके स्वच्छ आणि निर्मळ पाणी कधी पाहिले नव्हते. म्हातारा इतक्यावेळ चालून चाळून दमला होता आणि त्याला खूप तहान लागली होती.

मग त्याने आपल्या दोन्ही हातांची ओंजळ केली आणि पाणी प्यायला. पाणी प्यायल्या नंतर त्याच्या शरीरात एक वेगळीच थरथर त्याला जाणवली. त्याने पहिले कधी असा अनुभव घेतला नव्हता. त्याला असे वाटले की या पाण्याने त्याच्या शरीरातला कण न कण स्वच्छ आणि निर्मळ झाला आहे.

त्यानंतर तो गवतावर झोपला. आता त्याची धनुष्यासारखी पाठसुद्धा दुखत नव्हती. मग तो गाढ झोपला.

जेव्हा तो झोपेतून उठला तेव्हा दोन डोंगरांच्या मधून सूर्य अस्ताला जात होता. म्हाताऱ्या माणसाने आपल्या हाताची मुठ उघडली आणि परत बंद केली. तो एका झटक्यात उठून उभा राहिला. त्याच्या मांसपेशींमध्ये एक नवी ताकद आली. त्याने एवढी शांती याआधी कधी अनुभवली नव्हती. त्याचबरोबर त्याच्या शरीरात उर्जा भरलेली त्याने अनुभवली.

मग एका तरुण हरणासारखे पळत तो जंगलात गेला. तिथे त्याने पटकन सगळ्या दिवसाचे काम पूर्ण केले..

पण जेव्हा संध्याकाळी तो आपल्या घरी परत आला, तेव्हा त्याला बघून त्याची पत्नीने आ वासला. पत्नी त्याला बघतच राहिली.

“अरे! हे तुम्हांला काय झाले? तिने रडत विचारले.

“काय झाले? माझ्याकडून काही चुकले का?” म्हाताऱ्या माणसाने विचारले.





मग म्हाताऱ्या स्त्रीने आपल्या पतीच्या बोटांनी त्याचाच चेहरा कुरवाळला. तेव्हा म्हाताऱ्या माणसाला झटका बसला. काय झालं? तेव्हा कुठे त्याला सगळं समजले. तो परत तरुण झाला होता.त्याचे तारुण्य परत आले होते.मग त्याने आनंदाने आपल्या पत्नीला निळ्या चिमणीचे गाणं आणि त्या जादूच्या झऱ्याबद्दल सांगितले. मग दोघं मिळून आनंदाने अश्रू वाहू लागले..

दुसऱ्या दिवशी त्या माणसाने आपल्या पत्नीला सुद्धा जंगल्यातल्या दरी मध्ये घेवून गेला. त्याने आपल्या पत्नीला तो झरा दाखवला. झऱ्याचे एक घोट पाणी पिल्यानंतर पत्नी सुद्धा एक युवती झाली. आणि तिच्यामध्ये सुद्धा शक्ती आली. मग ते तरुण दांपत्य आनंदाने घरी आले. मग त्यांनी आपल्या भविष्याबद्दल नवीन स्वप्ने सजवली.

त्यांच्या लालची शेजाऱ्याने त्यांचे हे बदललेले रूप लक्षपूर्वकं पाहिले.एक दिवस ते दांपत्य बागेत काम करत होते, तेव्हा तो शेजारी त्यांच्याजवळ आला.

"माझ्या मित्रांनो, तुमचे नशीब चमकत आहे असे वाटते." त्याने खोटं हसून म्हटलं.

"हो! हो!" म्हातारा माणूस त्याचं बोलणं अर्धवट तोडत म्हणाला, "आम्हांला सुद्धा एक मुल असते तर किती बरं झालं असतं, आम्ही आमचा आनंद त्याच्याबरोबर वाटून घेवू शकलो असतो."

मग त्या तरुण माणसाने आपल्या शेजाऱ्याला त्या जादुच्या झऱ्याचे रहस्य सांगितले आणि तिथे जाण्याचा रस्ता सुद्धा सांगितला. "तुम्हांला त्या झऱ्याच्या पाण्याच्या एका घोटाची गरज आहे," त्याने शेजाऱ्याला सांगितले.

हे ऐकताच तो लालची शेजारी झऱ्याकडे पळाला. त्याने पटापट दरी पार केली आणि दोन दगडांच्या मध्ये असणाऱ्या झऱ्याजवळ तो पोहचला. मग तो गुडघ्यावर बसला आणि त्याने दोन्ही हातांनी झऱ्याचे पाणी प्यायला सुरुवात केली.
त्याने पोटभरून पाणी प्यायले. त्याने इतके पाणी प्यायले की त्याला चालणे मुश्कील झाले. त्याने जवळच सावली बघितली आणि तो झोपून गेला.



संध्याकाळी नंतर रात्र होवू लागली आणि त्यांचा शेजारी परत आला नाही तेव्हा ते तरुण दांपत्याला काळजी वाटू लागली. तेव्हा ते कंदील घेवून त्याला शोधायला गेले. जेव्हा ते दरीजवळ पोहचले तेव्हा त्यांना कोणाच्या तरी रडण्याचा आवाज आला.

तरुण दाम्पत्याने भराभर पाउले उचलली. त्यांच्या शेजाऱ्याच्या कोटात एक लहान मुल पहुडले होते. मुल रडत होते आणि आपले पाय उडवत होते.पत्नीने मुलाला उचलले आणि आपल्या छातीला लावले. मग लगेच मुलाचे रडणे थांबले.
मग ते पती-पत्नी त्या बाळाला घेवून घरी परत आले. त्यांनी मोठ्या लाडाने त्या मुलाला सांभाळले.

त्यानंतर ते दांपत्य आनंदाने अनेक वर्ष जगले.